दिवाणी व फौजदारी न्यायालय, आष्टी

पुर्नवसन कॉलनी, आष्टी, जि. वर्धा

Email :– mahwarashsc@indianjudiciary.gov.in Tel. No. :– 07156–225824

जा.क्र. ९२०८ /संगणक/निविदा/२०२५ दिनांक १०/११/२०२५

दरपत्रक / निविदा

दिवाणी व फौजदारी न्यायालय, आष्टी या आस्थापनेकरीता पुढील नमुद प्रिंटरसाठी प्रत्येकी ०४ या प्रमाणे नविन कॉम्पीटेबल टोनर कार्टेजबाबत स्थानिक पुरवठादाराकडून दरपत्रक / निविदा मागविण्यात येत आहे.

Sr. No.	Name of Article
1	Canon LBP 2900b
2	Kyocera M2040dn
3	H. P. M1136MFP
4	HP ProM202dw
5	Canon LBP151DW
6	Canon LBP246DW Compatible Toner Cartridge

करिता सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन दिनांक 19 नोव्हेंबर, २०२५ चे सायंकाळी ५–०० वाजेपर्यंत **खालील विवरणाप्रमाणे व नमुद अटी व शर्तीस अधिन राहून दरपत्रक** दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, आष्टी येथे बंद लिफाफ्यामध्ये सादर कराव्यात. तदनंतर प्राप्त होणा–या मोहरबंद निविदा/दरपत्रकाचा प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही, याबाबत नोंद घेण्यात यावी.

अटी व शर्ती :-

१. मोहरबंद/सीलबंद लखोटयावर "**लेझर प्रिंटरसाठी Compatiable Toner Cartridge दरपत्रक**" असा ठळक अक्षरात उल्लेख करावा व ती खालील नमुन्यातच दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, आष्टी येथे सादर करावीत.

Sr. No.	Name of Article	Qty	Rate	Applicable GST/CGST Rate	Total Amount
1	Canon LBP 2900b				
2	Kyocera M2040dn				
3	H. P. M1136MFP				
4	HP ProM202dw				
5	Canon LBP151DW				
6	Canon LBP246DW Compatible Toner Cartridge				

२. दरपत्रकातील/निविदेमधील नमूद दर हे सर्व करांसहीत तसेच बसवून देणेसह आणि पडताळणीसह नमुद करावे.

३. प्रिंटर टोनर कार्टेजची मागणी केल्यानंतर पुरावठाधारकाने पुर्वी जे टोनर प्रिंटरमध्ये बसविले होते ते जुने टोनर पुरवठाधारक परत नेऊ शकतील त्यामुळे दरपत्रकात दर नमुद करतांना सदरील बाबींचा विचार करुनच कमीत कमी दर आकारुन दरपत्रक/निविदा सादर करावीत.

४. ज्यावेळेस प्रिंटर टोनर कार्टेजची मागणी करण्यात येईल त्यावेळेस सील असलेले प्रिंटर टोनर कार्टेजच स्विकारण्यात येतील. रिफीलींग केलेले कार्टेज स्विकारण्यात येणार नाही.

५. दर करार केल्यानंतर प्रिंटर टोनर कार्टेज उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेवर/पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच सदर कालावधीत पुरवठादारास सदर साहित्याबाबत कोणताही जास्तीचा दर आकारता येणार नाही.

६. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब होत असल्यास विलंब आकार, व्याज किंवा इतर अतिरिक्त शुल्क देय राहणार नाही.

७. प्रिंटरचे बसविण्यात येणारे कॉम्पीटेबल टोनर कार्टेज हे दर्जेदार व उच्च प्रतीचे राहील. सदरील टोनरमध्ये समाविष्ट असलेली शाई/पावडर हे उच्च प्रतीची असणे आवश्यक आहे.

८. कोणतेही दरपत्रके/निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके/निविदा नाकरण्याचा हक्क हे न्यायालय राखून ठेवीत आहे.

९. प्रत्येक पुरवठाधारकाने फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

१०. टोनरची मागणी नोंदविल्यानंतर ताबडतोब पुरावठाधारकास या कार्यालयास टोनर कार्टेज उपलब्ध करुन द्यावे लागेल. त्याकरीता कोणताही भत्ता किंवा वाहन या न्यायालयाद्वारे पुरविण्यात येणार नाही.

११. पुरविण्यात आलेल्या टोनर कार्टेजमध्ये दोष आढळून आल्यास/काही दोष उत्पन्न झाल्यास तो तात्काळ बदलून द्यावा लागेल.

१२. सदरील सुचनेचे पालन न केल्यास कोणत्याही टप्यावर, कोणत्याही क्षणी अथवा करार सुंपष्टात आणण्याचे अधिकार न्यायालयाने राखून ठेवले आहे.

१३. टोनरचा पुरवठा केल्यानंतर पेपरवरील प्रिंटींग पुसल्या जात असल्याचे निर्देशनास आल्यास ते प्रिंटर टोनर कार्टेज स्विकारण्यात येणार नाहीत व ते बदलून देण्याची सर्वस्वी जबाबदारी टोनर पुरवठाधारकावर राहील तसेच पुन्हा तोच टोनर पुरवठा केल्यास त्याचा मोबदला देण्यात येणार नाही.

१४. सर्व टोनरमध्ये शाई/पावडर हे १०० टक्के पूर्ण क्षमतेने भरलेले असावेत टोनरचे प्रमाण कमी भरल्याचे आढळून आल्यास किंवा टोनर खराब निघाल्यास ते टोनर परत नवीन बदलवुन द्यावे लागेल बदलविण्यात आलेल्या टोनरचा वेगळा मोबदला दिला जाणार नाही.

१५. निविदाधारकांनी दरपत्रक/निविदा दिवाणी व फौजदारी न्यायालय, आष्टी येथे दि. १९/११/२०२५ रोजीपर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १०/११/२०२५

CIVIL AND CRIMINAL COURT * ASHTI *

दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
आष्टी

प्रतिलीपी :-

१. मा. जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस फलकावर प्रकाशीत करण्याकरीता.

२. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, आष्टी येथील नोटीस फलकावर प्रकाशीत करणेकरीता.